महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ६७
COMMISSIONERATE OF ANIMAL HUSBANDRY
स्पायसर मेमोरिअल कॉलेज समोर, औंध, पुणे ४११ ०६७.
Maharashtra State, Opposite Spicer Memorial College, Aundh, Pune 411067

## गट-क संवर्गातील सरळसेवेने रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात २०२३

पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील गट क संवर्गातील रिक्त पदे भरण्याकामी दि.२६.०५.२०२३ रोजी प्रसिद्ध जाहिरातीनुसार दिनांक ९.९.२०२३,११.९.२०२३ व १२.९.२०२३ या कालावधीत ऑनलाईन परिक्षा घेण्यात आली होती. सदर परिक्षेमध्ये ४५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळालेल्या उमेदवारांची यादी आयुक्तालयाच्या संकेत स्तळावर दि. २३ /११/२०२३ रोजी सदरील जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदनिहाय संख्या व सामाजिक आणि समांतर आरक्षणनिहाय गुणवत्तेनुसार प्रदर्शीत करण्यात आली आहे. सदर परिक्षेंअती प्रारुप निवड यादी संवर्गनिहाय / प्रवर्गनिहाय मुळ अर्हता व पात्रता अभिलेख/ कागदपत्रे तपासणीस अधिन राहुन जाहीर करण्यात येत आहे.

सदर निवड यादीमध्ये नाव समाविष्ट केले म्हणजे त्या उमेदवारास नियुक्ती दिली असा अर्थ होत नाही. उमेदवाराची अंतिम निवड यादी ही संबंधीत उमेदवाराचे विहीत सेवाप्रवेश नियमानुसार अर्हता व मुळ कागदपत्रे तपासणी अंती त्याचप्रमाणे सामाजिक व समांतर आरक्षणाच्या अनुषंगाने सादर प्रमाणपत्रांची सक्षम प्राधिकारी यांचेकडून पडताळणी केल्या नंतरच अंतिम निवड यादी जाहीर करण्यात येणार आहे. उमेदवाराने सादर केलेली माहिती चुकीची / खोटी आढळल्यास अगर सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत सक्षम प्राधिकारी यांनी अवैध / बाद ठरविल्यास, संबंधीत उमेदवाराचे नाव वरील निवडयादीमधून कमी करण्यात येईल व प्रतिक्षायादीतील गुणानुक्रमे पुढील उमेदवारास संधी देण्यात येईल. प्रतिक्षायादी यथावकाश जाहीर करण्यात येईल.

तसेच उपरोक्त प्रारुप निवड यादितील उमेदवारांना वरील नमूद केलेनुसार मूळ कागदपत्रे तपासणी व बायोमॅट्रीक तपासणी करीता उपस्थित राहण्याचे वेळापत्रक लवकरच या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार उमेदवारांनी उपस्थित रहणे आवश्यक आहे.

आयुक्त पशुसंवर्धन,
महाराष्ट्र राज्य, पुणे ६७